**अर्थसंकल्पीय अनुदान २०११-२०१२ ग्रामीण भागामध्ये विशेष घटक योजनेखाली अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकामधील कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत अनुदाने मंजूर/ मुक्त करणेबाबत (लेखाशीर्ष २२१५ ९५९५)**

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र. ग्रापायो-१२१२/प्र.क्र.१०२ /पापु-०७
मंत्रालय, मुंबई -३२, दिनांक : ०६ मार्च, २०१३

वाचा:- १) पा. पु.व स्व. वि., शा.नि. क्र. ग्रापाधो-१११९/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : १८ नोव्हेंबर, २०११
२) पा. पु.व स्व. वि., शा.शुद्धीपत्रक. क्र. ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१३३/पापु-०७, दिनांक : १४ ऑगस्ट, २०१२
३) पा. पु.व स्व. वि., शा.निर्णय समक्रमांक दि.०३ ऑगस्ट,२०१२

**प्रस्तावना:-**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त, ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राज्यामध्ये लागू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील अनुसुचित जातीच्या त्याचप्रमाणे नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये वैयक्तिक शौचालये त्याचप्रमाणे खाजगी नळ जोडण्या देणे अभिप्रेत आहे. या योजनेच्या अंमलबजावणी कार्यपद्धतीमध्ये संदर्भ क्र.२ येथाल शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेली आहे.

२. सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षासाठी या योजनेसाठी विशेष घटक योजनेखाली, लेखाशीर्ष २२१५ ९५९५ खाली एकूण रु.६०.०० कोटीची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.१५.०० कोटी इतक्या निधीचे वाटप संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आलेले आहे.

३. या योजनेसाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीपैकी रु.३३.०० कोटी तरतूद अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर तरतूद संबंधित यंत्रणांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत ग्रामीण भागात घ्यावयाच्या उपाययोजनांसाठी, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांना सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ-३ मध्ये दर्शविलेल्या वाटपानुसार रु.३३.०० (रुपये तेहतीस कोटी फक्त) इतकी तरतूद मंजूर व मुक्त करण्यात येत असून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर आहरणासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर अनुदान संबंधित यंत्रणांना पुढील अटीवर रोख मुक्त करण्यात येत आहे.

अ) हे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेने खर्च करावे.

ब) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणारा निधी जिल्हा परिषदेकडून ज्या नियमित खात्यांमध्ये जमा करण्यात येतो, त्याच खात्यामध्ये हा निधी जमा करण्यात यावा.

क) या योजनेअंतर्गत घेतलेल्या कामांचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल संचालक, पाणी स्वच्छता व सहाय्य संस्था, नवी मुंबई यांचेकडे दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत न चुकता सादर करावा.

ड) वरील मंजूर अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे अतिरिक्त संचालक, वासो यांचेमार्फत शासनाकडे विहित प्रपत्रात सादर करण्यात यावी.

इ) तसेच मासिक विवरणपत्रानुसार (Cash Flow) अनुदान खर्ची घालण्यात यावे.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. वाय-२, २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०२) (२३) अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबियांना वैयक्तिक पाणी पुरवठा व नळ जोडणी देण्यासाठी सहाय्यक अनुदान (२२१५ ९५९५), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व या आर्थिक वर्षासाठी त्याखालील मंजूर तरतूदीतून भागवावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.८२/व्यय-३, दि. ११ फेब्रुवारी,२०१३ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१३०३०६१३१६२३६५२८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(र.अं.खडसे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१.मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
२.मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
३.सर्व विधी मंडळ सदस्य
४.प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक
५.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक
६.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७.विभागीय आयुक्त (सर्व)
८.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
९.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०.संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे,
११.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) बेलापूर, नवी मुंबई
१२.महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३.महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१४.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
१५.उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१६.अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१७.सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१८.सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१९.सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ
२०. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२१.सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२२.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२३.सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
२४.सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
२५.सर्व विशेष समाज कल्याण अधिकारी
२६.सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
२७.सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२८.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२९.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
३१.मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
३२पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
३३.निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

विवरण पत्र

शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापायो-१२१२/प्र.क्र.१०२/पापु-०७, दिनांक: ०६ मार्च,२०१३ चे सहपत्र.

| अ.क्र. | जिल्हा परिषद | या शासन निर्णयान्वये उपलब्ध करून देण्यात येत असलेला निधी (रु.) | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | |
| १ | ठाणे | १२०५८००० | (रु.एक कोटी वीस लक्ष अठ्ठावन्न हजार फक्त) |
| २ | रायगड | १९०५००० | (रु.एकोणीस लक्ष पाच हजार फक्त) |
| ३ | रत्नागिरी | ८७०००० | (रु.आठ लक्ष सत्तर हजार फक्त) |
| ४ | सिंधुदुर्ग | १३६८००० | (रु.तेरा लक्ष अड्डुसष्ठ हजार फक्त) |
| ५ | नाशिक | १५१४०००० | (रु.एक कोटी एकावन्न लक्ष चाळीस हजार फक्त) |
| ६ | धुळे | ३८७३००० | (रु.अडतीस लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त) |
| ७ | नंदुरबार | १४७०००० | (रु.चौदा लक्ष सत्तर हजार फक्त) |
| ८ | जळगाव | १०१८०००० | (रु. एक कोटी एक लक्ष ऐंशी हजार फक्त) |
| ९ | अहमदनगर | १७२०५००० | (रु.एक कोटी बाहत्तर लक्ष पाच हजार फक्त) |
| १० | पुणे | २७०४२००० | (रु.दोन कोटी सत्तर लक्ष बेचाळीस हजार फक्त) |
| ११ | सातारा | ८७३६००० | (रु.सत्त्याऐंशी लक्ष छत्तीस हजार फक्त) |
| १२ | सांगली | १११२७००० | (रु.एक कोटी अकरा लक्ष सत्तावीस हजार फक्त) |
| १३ | सोलापूर | २०५२२००० | (रु.दोन कोटी पाच लक्ष बावीस हजार फक्त) |
| १४ | कोल्हापूर | १५९६१००० | (रु.एक कोटी एकोणसाठ लक्ष एकसष्ठ हजार फक्त) |
| १५ | औरंगाबाद | १३३५३००० | (रु.एक कोटी तेहतीस लक्ष त्रेपन्न हजार फक्त) |
| १६ | जालना | ६४२६००० | (रु.चौसष्ठ लक्ष सव्वीस हजार फक्त) |
| १७ | परभणी | ५४१२००० | (रु.चोपन्न लक्ष बारा हजार फक्त) |
| १८ | हिंगोली | ३५७४००० | (रु.पस्तीस लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त) |
| १९ | बीड | ९९८३००० | (रु. नव्याण्णव लक्ष त्र्याऐंशी हजार फक्त) |
| २० | नांदेड | १७६८४००० | (रु.एक कोटी शहात्तर लक्ष चौ-याऐंशी हजार फक्त) |
| २१ | उस्मानाबाद | ८७२५००० | (रु. सत्त्याऐंशी लक्ष पंचवीस हजार फक्त) |
| २२ | लातूर | १४३५०००० | (रु.एक कोटी त्रेचाळीस लक्ष पन्नास हजार फक्त) |
| २३ | बुलढाणा | ८५७७००० | (रु. पंच्याऐंशी लक्ष सत्त्याहत्तर हजार फक्त) |
| २४ | अकोला | ५९७९००० | (रु.एकोणसाठ लक्ष एकोणऐंशी हजार फक्त) |
| २५ | वाशिम | ५७७४००० | (रु.सत्तावन्न लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त) |
| २६ | अमरावती | १५८५४००० | (रु. एक कोटी अठ्ठावन्न लक्ष चोपन्न हजार फक्त) |
| २७ | यवतमाळ | ८९७४००० | (रु.एकोणनव्वद लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त) |
| २८ | वर्धा | ५६३१००० | (रु.छप्पन लक्ष एकतीस हजार फक्त) |
| २९ | नागपूर | २४७२२००० | (रु.दोन कोटी सत्तेचाळीस लक्ष बावीस हजार फक्त) |
| ३० | भंडारा | ७१६९००० | (रु.एकाहत्तर लक्ष एकोणसत्तर हजार फक्त) |
| ३१ | गोंदिया | ५९५३००० | (रु. एकोणसाठ लक्ष त्रेपन्न हजार फक्त) |
| ३२ | चंद्रपूर | १०५४०००० | (रु. एक कोटी पाच लक्ष चाळीस हजार फक्त) |
| ३३ | गडचिरोली | ३८६३००० | (रु. अडतीस लक्ष त्रेसष्ठ हजार फक्त) |
| | **एकूण** | **३३००००००** | (रु.तेहतीस कोटी फक्त) |

(र.अं.खडसे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन